# ४ हजाराच्या दराला भुलू नका, भुलवूही नका

**चिंतामण पाटील**

**जळगाव, दि. १२ –**वाढत्या महागाईसाठी झगडा सुरु असताना महागाईचा पहिला फटका शेतकऱ्याला बसतो ह्याची जाण फारशी कोणाला नाही. त्यामुळे शेती मालाचे दर वाढले म्हणजे शेतकऱ्याचे चांगले दिवस आले अशी आवई उठवली जाते. आता कापसाला खरेदीच्या सुरुवातीला व्यापारी ४ हजाराचा दर देत असल्याने शेतकरी तसा समाधानी दिसतो परंतु हा दर विचारात घेता कापसाच्या एकेका बोंडामागे शेतकऱ्याला किती कष्ट उपसावे लागतात आणि किती खर्च करावा लागतो त्याचाही विचार करणे गरजेचे आहे.

फक्त चारच महिन्यात घरात पैसा येतो म्हणूनच शेतकरी या पिकाकडे वळत असले तरी हे पिक शेतकऱ्यांना संकटाच्या खाईत लोटत असल्याचे चित्र दिसू लागले आहे. कसे घेतले जाते हे पिक आणि किती वेळा त्यासाठी खपावे लागते ते येथे पाहाणे गरजेचे आहे. इतर कोणत्याही पिकापेक्षा बागायती कापसासाठी फार खपावे लागते. लावणीपूर्वी शेताची नांगरणी केली जाते. काही शेतकरी ट्रॅक्टरच्या सहाय्याने ट्रिलर करुनही शेत तयार करतात. नंतर वखरणी करुन ट्रॅक्टरच्या अगर बैलजोडीच्या सहाय्याने सऱ्या पाडल्या जातात. ऐन उन्हाळ्यात पाण्याची टंचाई असताना या सऱ्यांची ओलवणी केली जाते. त्या नंतर लगेच दुसऱ्या दिवशी अगर वाफसा आल्यावर मजूर लावून लावणी केली जाते. नंतर आठवड्याभरानंतर रासायनिक खताचा पहिला डोस दिला जातो. १५ मेच्या सुमारास लावणी केलेली असल्यास १५ जूनच्या आसपास सऱ्या मोडण्यासाठी वखरणी केली जाते. लगेच पाऊस येईल हि अपेक्षा. पाऊस न आल्यास पुन्हा उगवलेल्या कापसाच्या झाडालगत सऱ्या ओढून पुन्हा पाणी द्यावे लागते. सऱ्यांमध्ये तण झाले असल्यास ते याच कालावधीत मजूर लावून काढावे लागते.

एव्हाना पावसाळा सुरु होत असतो. महिना–दीड महिन्याचे पीक झाल्यावर रासायनिक खताचा दुसरा हप्ता दिला जातो. त्यासाठी मजूर लावले जातात. बियाण्यावर प्रक्रिया केलेली असल्याने दीड महिन्याचे पीक होईस्तोवर कापसावर कोणताही रोग येत नाही. दीड महिन्यानंतर मात्र तुडतुडे, मावा या सारख्या रसशोषक किडीचा उपद्रव सुरु होतो. त्यासाठी दोन–दोन, तीन–तीन औषधे एकत्र करुन फवारणी सुरु होते. ती आता येथून पुढे पीक साडे तीन ते चार महिन्याचे होई पर्यंत दर आठवड्याला अगर पंधरा दिवसाला सुरु राहते. दरम्यानच्या काळात कधी पाऊस लांबणीवर पडला तर पीक धोक्यात सापडते तर कधी अतिवृष्टीनेही कोमेजून जाण्याचे संकट कोसळते. फुले पात्या लागण्याच्या सुमारास पाऊस सुरु राहिला तर ओल्याव्यामुळे बुरशीजन्य रोगांचे आक्रमण होऊन पीक हातचे जाऊ पाहते. यातूनही पीक सहीसलामत सुटलेच आणि सप्टेंबरच्या दुसऱ्याही आठवड्यात पाऊस येऊ लागला तर फुटण्याच्या अवस्थेत असलेल्या पक्व कैऱ्या कुजू लागतात. याच कालखंडात व्यापारी कापसाची खरेदी सुरु करतात. त्यावेळी कापसाचा दर फारच चांगला वाटतो परंतु हा दर कापूस विकणाऱ्या उत्पादक शेतकऱ्या कसा वाटतो ते त्यालाच माहिती. ज्यावेळेस त्याच्या हाता हा पैसा पडतो त्यावेळी तो लावणीपूर्व व लावणी पासून कापसासाठी आलेल्या खर्चाचा हिशेब करीत नाही. करील तर त्याच दिवशी कापूस न घेण्याचा निर्णय घेऊन टाकेल. कारण भरपूर राबविणारं, मजूरी लागणारं, खतं खाणारं आणि किटनाशकाची फवारणी करावं लागणारं हे पीक आहे. त्यामुळे यंदा ४ हजाराचा दर मिळाला म्हणून शेतकरी हुरळून गेले आहेत असे कोणी समजत असेल तर ते स्वप्नांच्या दुनियेत वावरत आहेत असे समजावे.

कापसाचे दर मागच्यावर्षीही ३५००च्या आसपास होते. त्यात यंदा ५०० रुपयांचीच फक्त वाढ झाली आहे. मात्र कापूस पिक घेण्यासाठी जो खर्च लागतो त्यात गेल्यावर्षाच्या तुलनेत दुप्पट खर्च झाला आहे. खतांचा विचार केल्यास युरियासाठी रांगेत उभे राहूनही गेल्यावर्षी २५० ला घेतलेला युरीया यंदा ३७० ते ४०० रुपयाला एक गोणी खरेदी खरावी लागली. मजुरीचा विचार केला तर लावणी, निंदणीसाठी येणाऱ्या महिला मजुराला गेल्यावर्षी ४० ते ५० रू द्यावे लागत यंदा ७० ते १०० रुपये द्यावे लागले. आंतरमशागतीसाठी बैलोजोडीचे भाडे गेल्यावर्षी २५० रुपये होते. ते यंदा ४०० ते ५०० झाले. फवारणीसाठी येणाऱ्या मजुराला गेल्यावर्षी ७० ते १०० रुपये मजुरी दिली जायची ती यंदा १२५ ते १५० वर जाऊन पोहोचली. एकूण खर्चात दुप्पटीने वाढ झालेली असल्याने कापसाचा दर ४ हजार फार आहे का? असा प्रश्न पडतोच. शिवाय कापसाच्या घसरलेल्या उत्पादनामुळे आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये भारताच्या कापसाला मोठी मागणी असली तरी सरकारचे निर्यात धोरण येथील कारखानदारांच्या हिताच्या बाजूने आणि शेतकरी विरोधात असल्याने निर्यात बंदी आणून सरकार शेतकऱ्याची गळचेपी करतेच. त्यामुळे हा भावही टिकण्याची शक्यता तशी कमीच. असे असल्याने कापसाला मिळणाऱ्या ४ हजाराच्या दराला शेतकरी भूलणार नाही हे नक्की.